# दिनांक ०८/०३/२०२२ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे इतिवृत्त

हजर पदाधिकारी

| | |
|---|---|
| १) सौ उज्वला प्रशांत माळके | सभापती |
| २) सौ मंगलाबाई भाऊसाहेब जाधव | सदस्या |
| ३) सौ संगिता भिका भिल | सदस्या |
| ४) श्री अजय भाऊसाहेब पाटील | सदस्य |
| ५) श्री भुषण काशिनाथ पाटील | सदस्य |
| ६) सौ कविता हरीलाल कोळी | सदस्या |
| ७) सौ ललिता जनार्दन पाटील | सदस्या |
| ८) श्री प्रेमराज बाजीराव पाटील | सदस्य |

हजर अधिकारी

१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद जळगांव.
२) पशुधन विकास अधिकारी (तां) पशुसंवर्धन विभाग जि.प.जळगाव
३) सहा.प्रशासन अधिकारी पशुसंवर्धन विभाग जि.प.जळगांव.
४) कनिष्ठ प्रशासन अधिकारी पशुसंवर्धन विभाग जि.प.जळगाव.

याप्रमाणे सभेत सन्मा.सदस्य/सदस्या,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यानुसार आजचे सभेत उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या,अधिकारी/ कर्मचारी यांचे स्वागत करून मा.सभापती यांच्या पुर्वपरवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. सदर सभेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे.

**विषय क्र.१** :- दिनांक १०/०२/२०२२ रोजी झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
**ठराव क्र.१७०** दिनांक १०/०२/२०२२ रोजी झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त वाचुन सर्वानुमते कायम करण्यात आले.

सुचक :- श्री प्रेमराज बाजीराव पाटील
अनुमोदक :- सौ.ललिता जनार्दन पाटील
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.२** :- सन्मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास रजा मंजूर करणे.
सन्मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत.

**विषय क्र.३** :- पशसुवर्धन विभागाकडे शासनाकडून प्राप्त झालेली महत्वाची परिपत्रके वाचून दाखविणे.
महत्वाची परिपत्रकांचे सभेत वाचन करून माहिती देणेत आली.

**विषय क्र.४** :- पशुसंवर्धन विभागातील साथरोग व तांत्रिक कामाचा आढावा घेणे.
संपुर्ण जिल्ह्यातील लसीकरणाबाबत तालुकानिहाय सभागृहात माहिती सादर करण्यात आली.

**विषय क्र.५** :- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मंजूर झालेल्या र.रु.८०,०००००/- चे सुधारीत तरतुदीपैकी पशुवैद्यकिय संस्थांना-पशुधनास अ जिवनसत्वे, खनिज मिश्रणे औषध पुरवठा करणे अंतर्गत र.रु.३०,०००००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र.१७१** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मा. जिल्हा नियोजन अधिकारी जळगाव कार्यालयाचे पत्र क्र.जिनिरा/जिवायो/पुनर्विनियोजन/२०२१/२२/संस-१/२७५/२०२२, दिनांक ११/०२/२०२२ अन्वये सुधारीत तरतुद र.रु.८०,०००००/-मात्र मंजूर केलेली आहे.सदर मंजूर तरतुदीपैकी पशुवैद्यकिय संस्थांना-पशुधनास अ जिवनसत्वे,खनिजमिश्रणे औषध पुरवठा करणे अंतर्गत र.रु. ३०,०००००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत आजचे सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

सुचक :- सौ.मंगलाबाई भाऊसाहेब जाधव
अनुमोदक :- श्री अजय भाऊसाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजुर.

Scanned by CamScanner

**विषय क्र.६** :- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मंजूर झालेल्या र.रु.८०,०००००/-चे सुधारीत तरतुदीपैकी स्थानिक स्तरीय पशुवैद्यकिय दवाखान्यांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करणेकरीता आधुनिक साहित्य पुरवठा करणे (Animal Metal Detector, Animal Vaccination Gun, Animal P.M.Set) साठी र.रु.२९,७२,४००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र.१७२** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मा.जिल्हा नियोजन अधिकारी जळगाव यांचे पत्र क्र.जिनिस/जिवायो/पुनर्विनियोजन/२०२१/२२/संस-१/२७५/ २०२२, दि.११/०२/२०२२ अन्वये सुधारीत तरतुद र.रु.८०,०००००/- मात्र मंजूर केलेली आहे. सदर मंजूर तरतुदीपैकी स्थानिक स्तरीय पशुवैद्यकिय दवाखान्यांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करणेकरीता आधुनिक साहित्य पुरवठा करणे (Animal Metal Detector, Animal Vaccination Gun, Animal P.M.Set) साठी र. रु.२९,७२,४००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत आजचे सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

सुचक :- श्री अजय भाऊसाहेब पाटील
अनुमोदक :- सौ.मंगलाबाई भाऊसाहेब जाधव
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.७** :- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मंजूर झालेल्या र.रु.८०,०००००/- चे सुधारीत तरतुदीपैकी स्थानिक स्तरीय पशुवैद्यकिय दवाखान्यांचे बळकटी करण व आधुनिकीकरण करणेकरीता उपकरणे, यंत्रसामुग्री पुरवठा करणे (Dystocia Set, Veternary Surgical Kit, Animal Lifter) साठी र.रु.१६,९०,२००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र.१७३** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२१-२२ पुनर्विनियोजन अंतर्गत पशुसंवर्धन विभागास मा.जिल्हा नियोजन अधिकारी जळगाव यांचे पत्र क्र.जिनिस/जिवायो/पुनर्विनियोजन/२०२१/२२/संस-१/२७५/ २०२२, दि.११/०२/२०२२ अन्वये सुधारीत तरतुद र.रु.८०,०००००/- मात्र मंजूर केलेली आहे. सदर मंजूर पशुवैद्यकिय दवाखान्यांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करणेकरीता उपकरणे, यंत्रसामुग्री पुरवठा करणे (Dystocia Set, Veternary Surgical Kit, Animal Lifter) साठी र.रु.१६,९०,२००/- मात्रचे योजनांचे खर्च व योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत आजचे सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

सुचक :- सौ.ललिता जनार्दन पाटील
अनुमोदक :- सौ.संगिता भिका भिल
ठराव सर्वानुमते मंजुर.

Scanned by CamScanner

विषय क्र.८ :- जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण लेखाशिर्ष २४०३-५६१६-३१ अंतर्गत प.वै.द.श्रेणी २ कंडारी ता.जळगाव येथे विद्युतीकरण करणेसाठी रु.१,५०,०००/- मागणी करणे.

ठराव क्र.१७४ जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण लेखाशिर्ष २४०३-५६१६-३१ अंतर्गत जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी २ कंडारी ता.जळगाव येथे विद्युतीकरण करणेसाठी र.रु.१,५०,०००/- पुनर्विनियोजनातून निधी मागणी करून व उपलब्ध निधीच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देणेबावत आजचे सभेत चर्चा करण्यात आली व त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

तरोच जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण लेखाशिर्ष अंतर्गत खालील नमुद योजनेसाठी जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे पुनर्विनियोजनातून निधी मागणी करून व उपलब्ध निधीच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देणेबाबत आजचे सभेत चर्चा करण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

| अ.क्र. | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ निमखेडी बु.ता.मुक्ताईनगर येथे पेव्हर ब्लॉक व दुरूस्ती करणे. | ८००००० |
| २ | पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ ऐनपूर ता.रावेर इमारत विद्युतीकरण करणे. | ३२०००० |
| ३ | पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ वहाळ ता.चाळीसगाव इमारत विद्युतीकरण करणे. | ३२०००० |
| ४ | पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ पहुर ता.जामनेर इमारत विद्युतीकरण करणे. | ३२०००० |
| ५ | पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ कासोदा ता.एरंडोल येथील परिवर निवासस्थान विद्युतीकरण करणे. | १७०००० |

सुचक :- श्री प्रेमराज बाजीराव पाटील
अनुमोदक :- सौ.संगिता भिका भिल
ठराव सर्वानुमते मंजुर.

येणेप्रमाणे सभेचे वरील विषय आज रोजी कायम करण्यात येत आहे.सभेचे कामकाज संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती,
जिल्हा परिषद, जळगांव.

U.P.Malake
सभापती
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती,
जिल्हा परिषद, जळगांव.

जा.क्र.पशुसं/अधिक्षक/आरआर/४४/२०२२

दिनांक १५/०३/२०२२

प्रत - माहितीसाठी सविनय सादर :-
१) मा.ना.अध्यक्षा सो. जिल्हा परिषद जळगांव
२) सर्व संबधींत अधिकारी/कर्मचारी पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद जळगांव माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती,
जिल्हा परिषद, जळगांव.

Scanned by CamScanner